मच्छिमार राज्यात १३ जिल्यांत मत्स्यसंवर्धन
विकास यंत्रणा स्थापन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१९८९/(नं.क्र.२९६/पदुम १३**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-८ फेब्रुवारी,१९९१.**

वाचाः- मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई-२ यांचे क्रमांक ०११३०१/१७०८९,
दिनांकः- १८ सप्टेंबर,१९८९ चे पत्र.

**शासन निर्णयः-**

लहान तलावात सधन मत्स्यसंवर्धनाच्या दृष्टीने मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणाची स्थापना ही योजना अत्यंत महत्वाची आहे. सद्या भंडारा,चंद्रपूर,नागपूर,यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्हयात ही केंद्र पुरस्कृत योजना राबविली जात आहे. या यंत्रणा स्थापन झाल्यामुळे लहान तलावातील मासळीचे दर हेक्टरी उत्पादन खुप मोठया प्रमाणात वाढण्यास मदत झाली आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील मच्छिमारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास पर्यायाने मदत झाली आहे. केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्रमांक ३१०१३/३/८६/एफवाय(३),दिनांक १४.४.८६ अन्वये पुणे व सातारा या जिल्हयात पत्र क्रमांक ३१०१३/३/८६-एफवाय(३),दिनांक ३९.१.८८ अन्वये सांगली जिल्यात पत्र क्रमांक ३१०१३/३/८६-एफवाय (३),दिनांक २९.१.८८ अन्वये सांगली जिल्हयात पत्र क्रमांक ३१०१३/२/८९-एफवाय(३),दिनांक ३ ऑगस्ट,१९८९ अन्वये राज्यातील ठाणे,सोलापूर,कोल्हापूर,औरंगाबाद,परभणी,लातूर,बीड,अमरावती,बुलढाणा आणि अकोला या १० जिल्यांत मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणाच्या स्थापनेस मंजूरी दिली आहे. अतः ही योजना उपरोक्त १३ जिल्हयांत मंजूर करण्याचा प्रश्न शासनाचे विचाराधीन होता.शासन आता खाली नमूद केलेल्या बिगर आदिवासी क्षेत्रातील ११ जिल्यांत मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापन करण्यास मंजूरी देत आहे.

१)पुणे २) सांगली ३) सातारा ४) कोल्हापूर ५) सोलापूर ६) औरंगाबाद
७) परभणी ८) लातूर ९) बीड १०) बुलढाणा ११) अकोला

२. या योजनेचे कार्यान्वयन मत्स्यव्यवसाय संचालनालयातर्फे होईल. त्यासाठी प्रत्येक जिल्हयात प्रत्येक यंत्रणेसाठी खालील नमूद केलेली पदे दिनांक २८.२.१९९१ पर्यंत मत्स्यव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास मंजूरी देत आहे.

| अ. क्र | पदनाम | वेतनश्रेणी | प्रत्येक जिल्हयाकरिता पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी | २२००-७५-२८००-द.रो.१००-४००० | १ |
| २. | सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | १२००-३०-१६६०-द.रो.४०-२०४० | २ |
| ३. | वरिष्ठ लिपिक | १२००-३०-१६६०-द.रो.४०-२०४० | १ |
| ४. | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक | ९५०-२०-११५०-द.रो.२५-१५०० | १ |
| ५. | वाहनचालक व स्वेच्छक वर्ग-३ | ९५०-३०-११५०-द.रो.१५-१०३०-२०-११५० | १ |
| ६. | मत्स्यक्षेत्रीक वर्ग-४ | ७७५-१२-९५०-द.रो.१५-१०३०-२०-११५० | २ |
| ७. | शिपाई | ७५०-१२-८७०-द.रो.१४-९४० | १ |
| ८. | पहारेकरी | ७५०-१२-८७०-द.रो.१४-९४० | १ |

३. या यंत्रणेच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करण्यासाठी प्रत्येक जिल्यांसाठी एक आढावा समिती त्या जिल्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येत आहे. या समितीचे सदस्य खालीलप्रमाणे राहतीलः-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा विभागीय मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचे चेअरमन | सदस्य |
| ३. | जिल्हा मध्यवर्ती चेअरमन किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | प्रमुख बँकेचे जिल्हा बँका जिल्हा व्यवस्थापक | सदस्य |
| ५. | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य |
| ६. | जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ७. | कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग (राज्यशासनाचा) | सदस्य |
| ८. | कार्यकारी अभियंता,पाटबंधारे विभाग (जिल्हा परिषद) | सदस्य |
| ९. | मुख्य कार्यकारी अधिकारी,मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा | सदस्य सचिव |

४. उपरोक्त समितीने दर तीन महिन्यांनी किमान एकदा यंत्रणेच्या कामाचा आढावा घेवून आपला अहवाल शासनास आणि मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई यांना सादर करावा.

५. या संबंधिचा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली नोंदविण्यात यावा व शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि-११९१/२११/अर्थसंकल्प-१४,दिनांक ७.२.९१ रक्कमेतून भागविण्यांत यावा. या यंत्रणावर येणाऱ्या खर्चाचा राज्य शासनाचा व केंद्र शासनाचा हिस्सा सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविला आहे.

डी-८-२४०५- मत्स्यव्यवसाय-१०१ भूजलशयीन मत्स्यव्यवसाय
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना
मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा (अंशतः केंद्र पुरस्कृत) (२४०५/०१६/४)

६. परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक नवीन यंत्रणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कार्यालय प्रमुख्य आणि आहरण व संवितरण म्हणून घोषित करण्यांत येत आहे.

७. मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे याकडे रक्कम सूपूर्द करण्यासंबंधीचा आदेशात/पत्रात अग्रीम रक्कम खर्च करताना सादर करण्यांत येणाऱ्या देयकावर आकस्मीकता निधीतून अग्रीम शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक आकनि-११९१/२११/अर्थसंकल्प-१४,दिनांक ७.२.१९९१ अन्वये मंजूर केलेले अशा स्पष्ट सूचना लाल शाईने अधोरेखित कराव्यात. त्याप्रमाणे शासन पत्र वित्त विभाग क्रमांक सीएनएफ-१९८३/१४०/बीयुडी-३,दिनांक २६ सप्टेंबर,१९८३ द्वारे केलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. मत्स्यव्यवसाय संचालक यांनी मंजूर अग्रीमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची एकत्रित माहिती महिन्यानंतरच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभाग आणि कृषि व पदुम विभाग यांना पाठवावी.

८. मत्स्यव्यवसाय संचालकांनी आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यांत आलेल्या अग्रीमाची प्रतीपूर्ती करण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव योग्य वेळी शासनास सादर करावा.

९. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे. कृपया पहा त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.२४/९१/व्यय-१,दि.१७.१.१९९१.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सौ.कांचन विजयन),
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,

मत्स्यव्यवसाय संचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई-४०० ००२.
जिल्हाधिकारी,पुणे,सातारा,सांगली,सातारा,सोलापूर,कोल्हापूर,औरंगाबाद,परभणी,लातूर,

बुलढाणा,अकोला,अमरावती,ठाणे व बीड
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,पुणे,सातारा,सांगली,सोलापूर,
कोल्हापूर,औरंगाबाद,परभणी,लातूर,बुलढाण,अकोला,अमरावती.
सर्व प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,पुणे,सातारा,सांगली,सोलापूर,कोल्हापूर,
औरंगाबाद,परभणी,लातूर,बुलढाणा,अकोला,अमरावती,ठाणे व बीड
उपआयुक्त,दुग्ध विकास व अधिक्षक अभियंता मंडळ कार्यालय,मुबंई-३८.
उप आयुक्त,दुग्ध विकास व अधिक्षक अभियंता,मंडळ कार्यालय-२,पुणे
कार्यकारी अभियंता,पाटबंधारे जिल्हा परिषद पुणे,सातारा,सांगली,सोलापूर,कोल्हापूर
औरंगाबाद,परभणी,लातूर,बुलढाणा,अकोला,अमरावती,ठाणे व बीड
जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,पुणे, सातारा,सांगली,सोलापूर,कोल्हापूर,औरंगाबाद
परभणी,लातूर,बुलढाणा,अकोला,अमरावती,ठाण व बीड.
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे,सातारा,सांगली,सोलापूर,कोल्हापूर,
औरंगाबाद,परभणी,लातूर,बुलढाणा,अकोला,अमरावती,ठाणे व बीड
महालेखापाल-१(लेखापरिक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई
महालेखापाल-१ महाराष्ट्र राज्य,नागपूर
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,व्यय-१/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३/अर्थसंकल्प-१४.
कार्यासन अधिकारी,पदुम-१२,पदुम-१४,पदुम-१६,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबइ
सचिव केंद्र शासन,भारत सरकार,कृषि मंत्रालय (कृषि व सहकार विभाग),कृषि
भवन,नवी दिल्ली.
सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,५ वा मजला,नवीन प्रशासकीय
भवन,मंत्रालय,मुंबई-४०००३२ (दोन प्रती)
निवड नस्ती

## विवरणपत्र "अ"

**आर्थिक खर्चाचा तपशील :**

प्रत्येक मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेकरिता पहिल्या वर्षी आणि त्यानंतरच्या प्रत्येक वर्षाकरिता खाली नमूद केल्याप्रमाणे आर्थिक निधी लागेल:-

| | बाब<br>अनावर्ती | पहिल्या वर्षी<br>(रु लाखात ) | पुढील प्रत्येक वषी<br>(रु लाखात ) |
|---|---|---|---|
| १ | जीप वाहनाची किंमत आवर्ती | २.०० | ----- |
| २ | कर्मचा-यांचे वेतन आणि प्रवास खर्च | १.३२ (सहा महिन्याकरिता | २.६४ |
| ३ | नवीन तळयांच्या बांधकामावरील अनुदान प्रत्येक वर्षी १० हेक्टर रु ५०,००० | - | १.२५ |
| ४ | निविष्टावरील अनुदान<br>१०० हेक्टर X रु ४००० (प्रत्येक वर्षी | -- | १.०० |
| ५ | प्रशिक्षण खर्च<br>५० उमेदवार X प्रत्येकी रु २५० प्रमाणे | ०.०३<br>(१२ उमेदवाराकरिता | ०.१३ |
| ६ | वाहनाचा खर्च धरुन कार्यालयीन आकस्मिकता खर्च | ०.८० | ०.८० |
| | एकूण | **४.१५** | **५.८२** |

केंद्र शासन व राज्य शासनाचा उपरोक्त बाब क्र १,३,४ आणि ५ वर प्रत्येकी ५०-५० इतका हिस्सा आहे.